THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 19TH APRIL 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २३ माहे फेब्रुआरी सन १८९४ रोजीं मंजूर केला: तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९४ चा आक्ट ३ रा.

**सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा आणि हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा सुधारण्याबाबद आक्ट.**

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा आणि हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा सुधारणें ज्या अर्थीं योग्य आहे, त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

**सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा.**

१. सन १८८२चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, ह्याच्या ४४व्या कलमांत खालील जास्त मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें:—

*सन १८८२चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा ह्याच्या ४४व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.*

"जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां त्याबद्दल हिंदुस्थानच्या पीनल कोडाच्या पुढें लिहिलेल्या ह्मणजे, ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ व ४६० ह्या कलमांपैकीं कोणत्याही कलमांत शिक्षा सांगितली आहे, तें कृत्य ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत आलें तर, तें, ह्या कलमाच्या कारणांसाठीं, अपराध होय असें समजलें पाहिजे."

२. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, कलम ४५, ह्यांत खालील मजकूर (ड) रकमेनंतर आणि खुलाशाच्या ऐवजीं दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें:—

*सदर्हू कायद्याच्या ४५व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.*

"(३) जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां त्याबद्दल हिंदुस्थानच्या पीनल कोडाच्या पुढें लिहिलेल्या ह्मणजे, ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९, व ४६०, ह्या कलमांपैकीं कोणत्याही कलमांत अपराध ह्मणून शिक्षा सांगितली आहे, तें कृत्य सदहू गांवाजवळच्या ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत येणें किंवा करण्याचा इरादा असणें ही गोष्ट.

"ह्या कलमांतील —

(१) "गांव" ह्या शब्दांत गांवच्या जमिनींचा समावेश होतो ; आणि

(२) "अपराधी असल्याबद्दल जाहीरनामा लागलेला" ह्या संज्ञेंत, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांत स्थापिलेल्या अगर चालू ठेविलेल्या कोणत्याही कोर्टानें अगर अधिकाऱ्यानें, जें कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां त्याबद्दल हिंदुस्थानच्या पीनल कोडाच्या पुढें लिहिलेल्या ह्मणजे, ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ व ४६० ह्यां कलमांपैकीं कोणत्याही कलमांत शिक्षा सांगितली आहे त्या कोणत्याही कृत्याच्या संबंधानें ज्या कोणत्याही मनुष्याबद्दल तो अपराधी आहे असा जाहीरनामा लाविलेला असेल, त्या मनुष्याचा समावेश होतो."

*सदहू कायद्याच्या ५४व्या कलमाची सुधारणा आणि त्यांत जास्त मजकूर दाखल करणें.*

३. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, ह्याच्या ५४ व्या कलमांतल्या पांचव्या रकमेंतला "आणि" हा शब्द रद्द करून सहाव्या रकमेच्या शेवटीं "आणि" हा शब्द दाखल करावा, आणि सहाव्या रकमेनंतर खालील मजकूर दाखल करावा : तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"सातवें—जें कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां अपराध ह्मणून त्याबद्दल शिक्षा सांगितली आहे तें कृत्य ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत आलें असून त्यांत जो कोणताही मनुष्य सामील झाला असेल अगर त्यांत जो सामील असल्याबद्दल वाजवी फिर्याद करण्यांत आली असेल अगर विश्वसनीय बातमी मिळालेली असेल अगर वाजवी वहीम असेल, आणि जो त्या कृत्याबद्दल अपराधी स्वाधीन करण्याविषयींच्या कोणत्याही कायद्याअन्वयें अगर सन १८८१चा पळून गेलेल्या अपराध्यांबाबदचा आक्ट ह्याअन्वयें किंवा एरव्हीं, ब्रिटिश इंडियांत पकडला जाण्यास अगर रखवालींत अटकावून ठेविला जाण्यास पात्र असेल, त्यास."

*सदहू कायद्याच्या २ऱ्या परिशिष्टांत जास्त मजकूर दाखल करणें.*

४. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, ह्याच्या २ऱ्या परिशिष्टांत, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या २१६व्या कलमासंबंधानें मजकूर आहे त्याच्या लगत खालीं, खालील मजकूर दाखल करावा : तो मजकूर येणेंप्रमाणें :—

| कोष्टक १. | कोष्टक २. | कोष्टक ३. | कोष्टक ४. | कोष्टक ५. | कोष्टक ६. | कोष्टक ७. | कोष्टक ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१६ अ. | जबरीची चोरी करणारे अगर दरवडे घालणारे ह्यांस आश्रय देणें. | वरप्रमाणें. | वरप्रमाणें. | वरप्रमाणें. | वरप्रमाणें. | सात वर्षांची सक्त मजुरीची कैद आणि दंड. | सेशन कोर्टास, प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास, किंवा पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास. |

## हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा.

५. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १७७व्या कलमांत खालील जास्त मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :— हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १७७ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

"खुलासा.—कलम १७६ ह्यांतील आणि ह्या कलमांतील "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां त्याबद्दल पुढें लिहिलेल्या ह्मणजे, ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९, व ४६० ह्या कलमांपैकीं कोणत्याही कलमांत शिक्षा सांगितली आहे, तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत आलें असतां त्याचा समावेश होतो; आणि "अपराधी" ह्या शब्दांत, जो कोणताही मनुष्य अशा कोणत्याही कृत्याबद्दल गुन्हेगार आहे ह्मणून ह्मणणें असेल, त्या मनुष्याचा समावेश होतो."

६. सदर्हू कायद्याच्या २०३ ह्या कलमांत खालील जास्त मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :— सदर्हू कायद्याच्या २०३ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

"खुलासा.—कलमें २०१ व २०२ ह्यांतील आणि ह्या कलमांतील "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां त्याजबद्दल पुढें लिहिलेल्या ह्मणजे, ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ व ४६० ह्या कलमांपैकीं कोणत्याही कलमांत शिक्षा सांगितली आहे तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियाच्या बाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत आलें असतां, त्याचा समावेश होतो."

७. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, ह्याच्या २१२व्या कलमांत, अपवादाच्या लगत आधीं, खालील मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :— सदर्हू कायद्याच्या २१२ व्या कलमांत सुधारणा.

"ह्या कलमांतील "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत करण्यांत आलें असतां त्याजबद्दल पुढें लिहिलेल्या ह्मणजे, ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८ ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ व ४६० ह्या कलमांपैकीं कोणत्याही कलमांत शिक्षा सांगितली आहे तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत आलें असतां त्याचा समावेश होतो; आणि ह्या कलमाच्या कारणांसाठीं, असें प्रत्येक कृत्य, आरोपित मनुष्य तशा कृत्याबद्दल ब्रिटिश इंडियांत गुन्हेगार असता, त्याप्रमाणें शिक्षेस पात्र आहे असें समजलें जाईल."

८. सदर्हू कायद्याच्या २१६व्या कलमानंतर खालील मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :— सदर्हू कायद्याच्या २१६ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करणें.

"२१६. अ. कोणतीही मनुष्यें जबरीची चोरी करण्याच्या अगर दरवडा घालण्याच्या बेतांत आहेत अगर त्यांनीं कांहीं दिवसापूर्वीं जबरीची चोरी केली आहे अगर दरवडा घातला आहे असें कोणत्याही मनुष्यास माहीत असून अगर असें वाटण्यास त्यास कारण असून त्यानें ती जबरीची चोरी करण्याचा अगर तो दरवडा घालण्याचा लाग साधावा ह्या इराद्यानें किंवा त्या सर्व मनुष्यांचा अगर त्यांपैकीं कोणत्याही मनुष्याचा शिक्षेपासून बचाव करण्याच्या इराद्यानें जर त्या सर्व अगर त्यांपैकीं कोणत्याही मनुष्यास जबरीची चोरी करणारांस अगर दरवडेखोरांस आश्रय देण्याबद्दल शिक्षा.

आश्रय दिला, तर त्यास सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद सात वर्षेंपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, व तो मनुष्य दंडासही पात्र होईल.

"**खुलासा**.—अशी जबरीची चोरी ब्रिटिश इंडियांत अगर ब्रिटिश इंडियाबाहेर करण्यांत येवो अगर करण्याचा इरादा असो अथवा असा दरवडा ब्रिटिश इंडियांत अगर ब्रिटिश इंडियाबाहेर घालण्यांत येवो अगर घालण्याचा इरादा असो, हें ह्या कलमाच्या कारणांसाठीं महत्वाचें नाहीं.

"**अपवाद**.—दादल्यानें आपल्या अपराधी बायकोस किंवा बायकोनें आपल्या अपराधी दादल्यास आश्रय दिला असेल त्या प्रसंगीं हा ठराव लागू नाहीं.

कलमें २१२ २१६ व २१६ अ ह्यांतल्या "आश्रय" ह्या संज्ञेची व्याख्या.

"२१६. ब. कलमें २१२,२१६ व २१६ अ ह्यांतल्या "आश्रय" ह्या शब्दांत, कोणत्याही मनुष्यास आसरा, अन्न, पिण्याचे पदार्थ, पैसा, कपडे, हत्यारें, युद्धसामग्री अगर एकाजागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचें साधन पुरविण्याचा अगर कोणत्याही मनुष्यास धरला जाण्याचे चुकविण्याचे कामी कोणत्याही प्रकारें मदत करण्याचा समावेश होतो."

(सही) **एम्. हार्वे जेम्स**,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख २ माहे मार्च सन १८९४ रोजीं पसंत केला; तो लोकांस जाहीर होण्य साठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९४ चा आक्ट ५ वा.

### दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा सुधारण्याबाबद आक्ट.

दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा सुधारणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी, खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

सरनामा व सुरुवात.

१. (१) ह्या कायद्यास सन १८९४ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा सुधारण्याबाबद आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सदर्हू कायद्याच्या ३१०व्या कलमानंतर एक नवीन कलम दाखल करणें.

२. दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा ह्याच्या ३१०व्या कलमानंतर खालीं दिलेलें कलम दाखल करावें : तें कलम येणेंप्रमाणें :—

कर्जाची रकम अनामत ठेवून फैसल्यांतील रिणकोनें विक्री रद्द करण्याबद्दल करावयाची अर्जी.

"३१० अ. ज्या कोणत्याही मनुष्याच्या स्थावर मिळकतीची ह्या बाबीअन्वयें विक्री झाली असेल त्याला, विक्रीच्या तारखेनंतर तीस दिवसांच्या आंत कोणत्याही वेळीं खालीं लिहिलेल्या कारणांसाठीं खालीं निर्दिष्ट केलेल्या रकमा कोर्टांत अनामत ठेवून ती विक्री रद्द व्हावी असा अर्ज करण्याचा अखत्यार आहे:

(अ) खरेदीदाराम देण्याकरितां, खरेदीच्या पैशाची शेंकडा पांच टक्के इतकी रकम, आणि

(ब) हुकुमनामेवाल्यास देण्याकरितां, विक्रीच्या जाहिरनाम्यांत जी रकम वसूल करण्यासाठीं विक्रीचा हुकूम झाला होता असें नमूद केलें असेल त्या रकमेंतून, जाहिरनाम्याच्या तारिखेपासून हुकुमनामेवाल्यास जी रकम मिळालेली असेल ती रकम बाद करून, बाकीची रकम.

"सदर्हू तीस दिवसांच्या आंत अशा रकमा जर अनामत ठेविण्यांत आल्या, तर कोर्टानें ती विक्री रद्द करण्याबद्दल हुकूम केला पाहिजे :

"मात्र, जर कोणताही मनुष्य आपल्या स्थावर मिळकतीची विक्री रद्द करण्यासाठीं लगत पुढच्या कलमाअन्वयें अर्ज करील, तर त्याला ह्या कलमाअन्वयें अर्ज करतां येणार नाहीं.

"विक्रीच्या जाहिरनाम्यांत समावेश न केलेल्या खर्चासंबंधाची आणि व्याजासंबंधाची फैसल्यांतील रिणकोची जी कोणतीही जबाबदारी असेल तींतून तो मुक्त होतो असा ह्या कलमांतील कोणत्याही ठरावाचा अर्थ करूं नये."

सदर्हू कायद्याच्या ३१५ व्या कलमाची सुधारणा.

३. दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा ह्याच्या ३१५ ह्या कलमांत, "कलम" ह्या शब्दानंतर आणि "३१२" ह्या आंकड्याच्या आधीं, "३१० अ" हा आंकडा व अक्षर हीं दाखल करावीं.

(सही) एम् हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.